महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : १४४२(अ)/मशिसेमविप/२०१७/२४** **दिनांक:- ११ सप्टेंबर २०२३**

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र शिक्षण (प्रशासन शाखा) गट-ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७ मधील महाराष्ट्र शिक्षण सेवा (MES) संवर्गाचा अंतिम निकाल**
**संदर्भ :- जाहिरात क्रमांक -४० /२०१७**

महाराष्ट्र शिक्षण (प्रशासन शाखा) गट-ब मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१७,मधील **महाराष्ट्र शिक्षण सेवा (MES)** या संवर्गाच्या ३१ पदापैकी २९ पदांचा निकाल, दिनांक ११ सप्टेंबर,२०२३ रोजी जाहिर करण्यात आला आहे.

(२) सदर परीक्षेमध्ये **श्री. लांडगे दत्तात्रय शिवाजी, मुलाखत क्रमांक ( ०५ )** हे प्रथम आले आहेत.

**(३)** प्रस्तुत पदाकरिता आयोगाने ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविले होते. अर्जासोबत उमेदवारांच्याा अर्हतेबाबत कोणतीही प्रमाणपत्रे मागविण्यात आली नव्हती. मुलाखतीवेळेस उमेदवारांच्या दाव्यांची तपासणी त्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्रांआधारे करण्यात येऊन मुलाखती घेण्यात आल्या आहेत. तथापि शिफारसपात्र उमेदवारांची प्रस्तुत पदासाठीची पात्रता तसेच त्यांचे गोपनीय अभिलेख,सदर परीक्षेच्या शासन परिपत्रकात नमूद केलेल्या तरतूदीनुसार नियुक्तीपूर्वी शासनस्तरावर तपासण्याच्या अधीन राहून सदर निकाल प्रसिध्द करण्यात येत आहे. प्रस्तुत तपासणीअंती अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

(४) प्रस्तुत अंतिम निकाल हा विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**(५)** सदर संवर्गाच्या दिव्यांग प्रवर्गाकरीता २ पदे आरक्षित होती. पैकी कर्ण बधिरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता (D, HH) या प्रवर्गाकरीता सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्याने सदर दिव्यांग प्रवर्गाकरीताचे १ पद रिक्त ठेवण्यात आले आहे.तसेच एका उमेदवाराच्या पात्रतेसंदर्भात न्यायिक प्रकरण प्रलंबित असल्यामुळे एका पदाचा निकाल राखून ठेवण्यात आला आहे.

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)

ठिकाण- नवी मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई